म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 20345
ग्रं. सं. ठाणें.
१०१०

# सुमोद्यान.

गुच्छ ४ था.

लेखक व प्रकाशक :

## विश्वनाथ नारायण वाड.

नासिक.

REFBK-0001696
REFBK-0001696

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत छापिलें.

१९१९

# सुहृदांस

काव्य ४३०

# काव्यकुसुमोद्यान

१९९६५

## गुच्छ १ ला

REFBK-0001696
REFBK-0001696

### १ मद्यपा

( फटका ).

भल्या जनांनो, मद्यप्राशन मार्ग भयंकर सोडावा ।
संसाराची करी दुर्दशा, मोह असा निज तोडावा ।
घटकाभर जें मिळे सौख्य त्यासाठीं सुखमय संसार ।
दुःखपूर्ण करण्यास सजति ते, वेडचांचा जणुं बाजार ।
दुष्काळानें दुर्मिळ झालें अन्नवस्त्र निज देशांत ।
अशा प्रसंगीं मदिरा सेवुनि यावें कां आवेशांत ।
कवडी दमडी घरांत न टिके, स्त्रीपुत्रांची काय कथा ! ।
विवेक करुनी मना विचारा, सोडूं कां ह्या दुष्ट पथा ? ।
थोडा हा उपदेश; परंतु, सार तयांतील तें घ्यावें ।
दुर्व्यसनांच्या नीचाचरणीं त्वच्चित्तानें लाजावें ।

——

## २ दुष्काळ व पुढारी.

हर ! हर ! जगदीशा ! दुर्दशा होय लोकीं ।
हृदय फुटत माझें जेधवा ती विलोकी ।
दिसति कितिक आतां अस्थिचे पिंजरे हे ।
बघुनि कठिण काळा नीर नेत्रांत वाहे ॥ १ ॥

बहुत जन असे कीं अन्न ज्यांतें मिळेना ।
स्थिति कठिण जनांच्या थोर नेत्यां कळेना ।
फुकट फुकट ह्यांचे चालती मात्र व्याप ।
स्वजनहित करूं हे व्यर्थ सारे प्रलाप ॥ २ ॥

बघुनि गरीब लोकां चित्त ज्यांचें द्रवेना ।
कठिणहृदयधारी वीर आम्हांत नाना ।
स्फुरण परि चढे त्यां मोठमोठ्या सभांत ।
कृतिवचन पहातां दुःख दाटे नितांत ॥ ३ ॥

सकल जग जयांना आत्मगेहासमान ।
कुठुनि मग उरे हो, त्यांमध्यें दंभ मान ? ।
स्वजनहित तयाना जाहलेंसे पसंत ।
स्थलिं कवण पहावें त्यापरी साधुसंत ? ॥ ४ ॥

करित मनिं विचारा मी यदा देवराया ।
बहुत विकल होतों, वाटती यत्न वाया ।
स्तविन म्हणुनि देवा, प्रेमरूपा सुखाचा ।
सुपथ गरिब लोकां दाखवावा हिताचा ॥ ९ ॥

## ३ गोखलेनिधन.

( ना. गोखले यांची मृत्युवार्ता समजतांच रचिलेलें )

अवचित **विधि** झाला आज अत्यंत क्रूर ।
म्हणुनि करितसे तो सुज्ञ **गोपाल** दूर ।
परिसुनि निधनातें दुःखसिंधूंत सारा ।
स्वजन बुडुनि जाई, व्यर्थ वाटे पसारा ! ॥ १ ॥
निवड करुनि नेई बहुत येथोनि रत्नें ।
कुटिल कितिक हेतू काल साधी प्रयत्नें ।
प्रभु परि तुज कैसा देखवे हा प्रकार ?।
सुजनहृदयदेशीं दाटला अंधकार ॥ २ ॥
बहुविध हितकार्यें जो अखंडीत साधी ।
स्वहित अखिल सोडी राहणी फार साधी ।
करतलमलवत् त्या हो सुविद्या प्रसन्न ।
कठिण दिवस देखे, हिंदभू होय खिन्न ॥ ३ ॥

चिरसुखकर शांती द्या तदात्म्यास देवा ! ।
शुभ पद प्रभु त्यातें आपुलें मात्र द्यावा ! ।
मम मन इतुकें हें बोलुनी शांत होई ।
कवन रचुनि दुःखा वाट मी आज देई ॥ ४ ॥

---

## ४ सीतावियोग.

**पंपा** सरोवराची शोभा पाहोनि मात्र **रामाचा** ।
शोक दुणावे, तेव्हां **वसंत** दावी प्रभाव कामाचा ॥ १ ॥
सौगंधिक सुमनांनीं पसरी वायू चहूंकडे वास ।
विरहाग्नी त्यायोगें **राघवहृदयांत** करितसे वास ॥ २ ॥
भ्रात्याला निज तेव्हां **राम** वदे पाहि **लक्ष्मणा** शोभा ।
पुष्पमय इथें दिसतें क्रीडे मारुत मनीं धरुनि लोभा ॥३॥
गिरिकंदरप्रदेशीं श्रवणमधुर गान वायु करि खचित ।
नृत्य म्हणोनी करिती तरुवर किति एक जें तया उचित॥४॥
कर्णिकार तरुवरती दिसतीं पिवळीं फुलें किती फुललीं ।
पीतांबरधारी नर वाटे ज्याची प्रभा जशी खुलली ! ॥५॥
विस्तृत पंख मयूरां पाहुनि राहे न स्वस्थ मम वृत्ति ।
जाळी **वसंतरूपी** पावक मजला जणूं दिसे चित्तीं ॥ ६ ॥

मयूर आणि मयूरी यांच्या क्रीडा पहा, पहा नीट ।
कातावियोग मजला का आणी आज लक्ष्मणा वीट ? ॥७॥

मधुनें परिपूर्ण अशा कंपित ह्या तिलकमंजरीवरती ।
झडप कशास्तव घाली भृंग ? तयाची तिथें अतीव रति॥८॥

पलाशतरु गिरीपृष्ठीं रक्तसुमोत्फुल्ल हे तयांना कीं ।
उपमा हुताशन पहा, ऐशी शोभा दिसेल कां नाकीं ॥ ९ ॥

पाही प्रिय बंधो, तूं सृष्टिसतीची कृती विचित्रा ही ।
प्रियजनवियोग दुःसह भारी, भगवन् मला अतां त्राही ॥ १ ०॥

सीता माझी आहे परमप्रिय चतुर सुंदरी कोठें ? ।
आली वनांत हर्षें, सोडुनि राज्यादि विभव हें मोठें ॥ १ १॥

कमलानना असे ती विशालनेत्रा तिचें मला वदन ।
दाखिव ही आस मनीं पुरवि लक्ष्मणा दुजें कठिण वद न। १ २।

भ्रांत असें मन माझें, पाउल टाकूं शकें न मी पुढतीं ।
आप्तांच्या विरहानें दिसतें जगतीं असेंच नर कुढती॥ १ ३॥

लक्ष्मण वदे तयाला रामा कोठोनि मोह हा आला ।
थोर पुरुष आपण परि कलुषितबुद्धी असे कसे झाला । १ ४।

शोकाधीन नसावें, धीर मनीं बाळगा सदा रामा ।
पाताळीं रावण जरि, आणिन तुमचीच निश्चयें रामा॥ १ ५॥

उत्साह हेंच मोठें दिसतें मजला यशास बल जगतीं ।
धीर पुरुष खिन्न न हो, इतर दुजे भूमिभारसे जगती॥ १६॥
ऐसें भाषण ऐकुनि सोडी मोहास राम मग नीट ।
चाले सुग्रीवाची घेण्या गिरि ऋष्यमूकिं तो भेट ॥ १७॥

---

## ५ अश्रुपात.

नकळें कां एकाएकीं काळिज हें बहु चरचरलें ।
निधनवृत्त ऐकुनि कविचें, मन माझें वेडें बनलें ।
प्रिय **महाराष्ट्र**वाणीचा कंठमणी कोणी हरिला ।
ह्या एका वर्षामध्यें कटु अनर्थ कीं ओढवला ।

मूर्तिमंत साधेपण तें ।
काव्यांत ओतिलें होतें ।
कवि **टिळक** कुशल ते पुरते ।

काळानें हरुनी नेला, बिनमोल हिरा हा असला ॥ १ ॥

तो म्हणे " प्रभू पसरी कीं जगतांत फुलें हीं सारीं ।
शिशु सुमन तशीं नक्षत्रें दिसतात विश्वसंसारीं "।
' **इतिहास फुलाचा** ' कथिला, प्रवृत्तिपंथ दावाया ।
शीलाविण शिक्षण ज्याच्या बुद्धीस वाटलें वाया ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६०६

सद्बोध दिला काव्यांनीं ।
कळकळिनें गाउनि गाणीं ।
श्रमविली पवित्रा वाणी ।
तें कार्य चालविल कोण ? सत्कविची जेथें वाण ॥ २ ॥
लक्ष्मीचा हर हर ! आता सौभासूर्य मावळला ।
निधनानें प्रियतम पतिच्या दुःखौघ तिजकडे वळला ।
शब्दांनें सांत्वन सतिचें मीं कसें करावें बोला ।
हा महाराष्ट्र दुःखानें दिसतसे आज हळहळला ।
आत्म्यास सुशांति द्यावी ।
साहित्योन्नति ही व्हावी ।
तत्परंपरा चालावी ।
एक हेतु चित्तीं उरला, परि पूर्ण पाहिजे झाला ॥ ३ ॥

---

## ६ पुनर्जन्म.

वाटे आज सुटोनिया पुनरपी आलों इथें भूवरीं ।
मृत्यो ! पाश तुझे निरर्थक खरे होतात केव्हां तरी ॥
सप्तशृंगनिवासिनी सदय जी माता तिला मी नमी ।
सारे जीवजगत् कसें नव दिसें जें पाहिलें नेहमीं ॥ १ ॥

क्लिष्टें ह्या जगतात येति परि त्या संस्कार हें कारण ।
त्यायोगें कितिदा पहा मनुज हा दुःखीं पडे दारुण ॥
श्रद्धा थोर असे प्रभूवरि, तरी काठिण्य कोठें वसे ? ।
पंगूनें चढणें गिरी सहज तो ईशकृपा ही दिसे ॥ २ ॥
झालों क्षीण ज्वरें बहूपरि अतां हर्षाश्रु येती पहा ।
मांझी जी करुणामयी भगवती ती प्रार्थिलीसे महा ॥
जें आयुष्य जगीं असेल उरलें सत्सेवनीं तें अतां ।
जावें, ही मनिषाःपुरो ! तरि मला आशीर्वचा दे स्वता ॥३॥

---

## ७ ईशें हेतू पुरवावे.

भेदभाव ह्या जगतांत ।
केलें मनुजानें येथ ॥
हा माझा, हा परक्याचा ।
मिथ्या मोह असे मनिंचा ॥ १ ॥
बहुत भेद तेणें होती ।
कलहानें केली माती ।
सुंदर सुखमय धरा पहा ।
द्वेषानें हो व्याप्त महा ॥ २ ॥

खरें पाहतां एक तुम्हीं ।
लक्ष असावें परिणामीं ॥

प्रार्थी प्रभुला अहर्निशीं ।
सौख्याची युक्ति खाशी ॥ ३ ॥

फुकट कशाला दंभ हवा ।
मत्सर द्वेष न मुळिं मिरवा ॥

जें जें वाटें तुम्हां हवें ।
दुजास मिळतां न पाहवें ॥ ४ ॥

ही कां रीती योग्य नरा ? ।
विचार व्हावा मनीं जरा ॥

परका अपुल्यासम समजा ।
तरी बघावी खरी मजा ॥ ५ ॥

सृष्टीचे उपकार पहा ।
[illegible]वें त्यांतिल तत्व महा ॥

वृक्ष न पाही भेद मुळीं ।
दुनिया त्यातें सम सगळी ॥ ६ ॥

पांथाला दे विश्रांति ।
फेडाया तुमची भ्रांति ॥

पक्षी करिती गायन हें ।
सुखार्थ तुमच्या तें आहे ॥ ७ ॥

प्रकाश देती रविशशि दोन ।
परोपकृति ही नसे लहान ॥
एकविचारें ह्या जगतीं ।
वागा तरि सुख संपत्ती ॥ ८ ॥

मिळेल हें वाटे मजला ।
म्हणुनि रची या कवनाला ।
तत्व सुजनहो तें ध्यावें ।
ईशें हेतू पुरवावे ॥ ९ ॥

---

## ८ देशोन्नति.

---

( आनंदी आनंद गडे. )

प्रातःकाळीं रम्य दिनीं । बसलों होतों उद्यानीं ।
विचार तों चित्तीं आले । हृदयीं काहुर माजविलें ।
दुनियेमाजीं ।
दुःख समाजीं ।
एक दुजाला कां देई । सरली वाटे पुण्याई ॥ १ ॥

नं. ३७०५
४३०

जातिद्वेष मतद्वेष । हाच नित्य चाले घोष ।
हित ह्यानें होतें काय ? । तुम्हीच सांगा प्रभुराय ।
तुमच्या हातीं ।
सर्व असे ती ।
उन्नति किंवा अधोगति । कवी म्हणोनी करि प्रणति ॥२॥
बोलघेवडे सर्व जन । स्वार्थत्यागीं कां न मन ?।
खरें देशहित साधावें । तरी प्रयत्नीं लागावें ।
स्वतः शिकावें ।
दुजास द्यावें ।
हाच मार्ग बरवा वाटे । थोर व्हाल ऐशा वाटें ॥ ३ ॥
इतरां नांवें ठेवाल । कार्य काय तें साधेल ।
थोर जनाचा उपकार । अपुल्यावरि आहे फार ।
शिक्षण त्यांनीं ।
दिलें म्हणोनी ।
कळलें सारें अपुल्यास । कृतज्ञता दावा त्यांस ॥ ४ ॥
भो परमेशा दावि अम्हां । बंधुबंधूंचा प्रेमा ।
सत्य दिसावें सर्वांना । कवी म्हणुनिया करि गाना ।
रोष दोष ते ।
सोडा परते ।
देशोन्नतिचा मार्ग बरा । स्वीकारुनि सत्कार्य करा ॥५॥

---

REFBK-0001696

REFBK-0001696